जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2018
सकाळ

# प्रलंबित निकाल राहिलेल्यांना तात्पुरता प्रवेश

## विद्यापीठाचा महाविद्यालयांना आदेश






**कोल्हापूर, ता. १६ :** निकालातील त्रुटी व प्रलंबित निकाल राहिलेल्या विद्यार्थ्यांना तात्पुरते प्रवेश देण्यात यावेत, असा आदेश शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने महाविद्यालयांना दिला आहे. त्याबाबतचे परिपत्रक काढले असून त्याची अंमलबजावणी केली जात आहे.

याबाबतचे वृत्त 'सकाळ'मध्ये 'विद्यार्थ्यांनो, परीक्षांचा निकाल आहे ऑन प्रोसेस' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाले होते. विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे गांभीर्याने घेत तात्पुरत्या प्रवेशाचा मार्ग मोकळा केला आहे.

'सकाळ'मध्ये त्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. प्रशासनाने त्याची दखल घेत तात्पुरत्या प्रवेशाची सोय उपलब्ध केली. परिपत्रकात म्हटले आहे, की मार्च, एप्रिल, मे २०१८ सत्रातील सर्व परीक्षार्थींचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. काही पुनर्परीक्षार्थींचे निकाल जाहीर होणे त्रुटींअभावी प्रलंबित आहे. त्रुटींच्या पूर्ततेनंतर निकाल जाहीर करण्यात येत आहेत. ज्यांच्या निकालात तांत्रिक त्रुटी आहेत, त्यांचे निकाल टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येतील. महाविद्यालय स्तरावर प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून अघोषित निकालाबाबत विद्यार्थी परीक्षा विभागाकडे येत आहेत.

17 JUL 2018
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या बागा

महेश कांबळे
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूरचं भरलेपण असणारा शिवाजी विद्यापीठाचा विस्तीर्ण परिसर. या परिसरामधील बगीचे आणि मन प्रसन्न करणारे वातावरण अनेकांना भुरळ घालते, आगळ्या-वेगळ्या रचनांमुळे विद्यापीठाच्या सौन्दर्यामध्ये भरच घालणारी ही उद्याने विकसित करण्यामागे खूप व्यापक दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. फावल्या वेळात मोकळ्या हवेत फिरण्यास येणारे ज्येष्ठ नागरिक, एकांतामध्ये अभ्यास करणारे विद्यार्थ्यांची पावले आपसूकच या परिसराकडे वळताना दिसतात.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतींसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा कायमच आकर्षणच केंद्र ठरला आहे. या पुतळ्याचा संरक्षण कठडा व वर्तुळाकार, आकर्षक बगीचा याची रचना पर्यटकांनाही आकर्षित करणारे असून विद्यापीठाच्या सौंदर्याचा मुख्य केंद्र आहे. या उद्यानामध्ये बालसम, सालबिया, होलियाक या झाडाची लावण केली जाते. बालसम या प्रजातीचे जीवनमान कमी असल्याने प्रामुख्याने पावसाळ्यामध्ये ही झाडे पाहावयास मिळतात. हेलियाक झाडांची उंची वाढण्याची क्षमता जास्त असल्याने वर्तुळाकार उद्यानाच्या पहिल्या रांगेमध्ये हीं झाडे लागली जातात. तसेच सालबिया झाडांना येणारी आकर्षक फुले ही लक्षवेधक असतात. या झाडांना लागणारी खाते विद्यापीठाने शोषखड्यांच्या माध्यमातून सेंद्रिय पद्धतीने तयार केली आहेत, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाच्या समोरील उद्यान विद्यार्थ्यांच्या आवडीचे ठिकाण आहे. अभ्यासाचा तणाव, विरुंगळा म्हणून या उद्यानाचा विद्यापीठातील प्रत्येक विध्यार्थ्याला लळा लागलेला असतो. अभ्यासातील चर्चा, मित्र- मैत्रीणीचे वाढदिवस साजरे करण्याचे तरुणाईचे हक्काचे ठिकाण म्हणून या उद्यानाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्याच्या शेजारील बगीचा ही हिरवळीने नटला आहे. याच हिरवळीवर पदपथांचे मार्ग निर्माण केले आहेत, टुमदार झाडे, पक्षांचा किलबिलाट कायमच मनप्रसन्न करणारा असतो. जुन्या पुणे-बंगलोर महामार्गावर असणारा वटवृक्ष महामार्ग साकारताना हटवण्यात आला होता. याच वटवृक्ष यशस्वीरित्या रिप्लान्ट येथे करण्यात आला आहे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे मानचिन्ह ही वटवृक्ष असल्याने या उद्यानाला एक वेगळे वलय प्राप्त झाले आहे. विद्यापीठातील सर्व उद्यानावर 'उद्यान विभाग' नियंत्रण ठेवून असतो, बागांची देखभाल, कटाई, सांडपाण्यापासून वृक्षांना दिले जाणारे पाणी, नवनवीन झाडांचे प्रत्यारोपण उद्यान विभागामार्फत केले जाते. सध्या विद्यापीठाचे सौंदर्य वाढवण्यासाठी लेडीज आणि बॉईज हॉस्टेल समोरील आयलँड विकसित करण्याचे तसेच विद्यापीठातील अधिविभाग आकर्षित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रीन विद्यापीठ बनवण्यास सर्वोच्च प्राधान्य दिले जाणार आहे.



> बगीचे आणि उद्याने यांची रचना वैशिष्ट्यपूर्ण केली आहे. सकाळी मोकळ्या वातावरणामध्ये फिरण्यास आल्याने दिवसभर प्रसन्न वाटते. खासकरून विद्यापीठाचा दर्शनी भाग मनाला आकर्षित करणारा आहे. प्रशासनाने स्वच्छतेला प्राधान्य दिल्याने येथील नैसर्गिक वातावरण मनाला भुरळ पाडते.
>
> **ओंकार माने**, विद्यार्थी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUL 2018
लोकमत

## विद्यापीठात आज रक्तदान शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या गणित अधिविभागामध्ये आज, मंगळवारी सकाळी ११ वाजता सीपीआर (छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय) यांच्या रक्तपेढीमार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. सध्याच्या पावसाळी दिवसांमध्ये अपघातांची संख्या वाढली आहे. यामुळे स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या दात्यांनी शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन विद्यापीठाच्या गणित अधिविभागामार्फत केले आहे.